## ९ ऑगस्ट क्रांती दिन'अहवाल

Ref: MES/ACSC/ACA/04/2019-20 Date : 09/08/2019

**प्रास्ताविक** :— कला, वाणिज्य व विज्ञान महाविदयालय, सोनई येथे शुक्रवार दि.९/८/२०१९ रोजी सकाळी ११:३० वा. रूम नं.१९ मध्ये '९ऑगस्ट क्रांती दिन' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी क्रांतीकारकांना व देशसेवेसाठी ज्यांनी योगदान दिले अशा सर्वांना अभिवादन करण्यात आले. क्रांती दिनाचा उद्देश व महत्व याविषयी विदयार्थ्यांना माहिती देण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व उद्देश याविषयीची माहिती डॉ.संभाजी दराडे यांनी दिली.

**सविस्तर माहिती** :— क्रांतीदिनाच्या निमित्ताने कार्यक्रम अतिथी म्हणून डॉ.सिताराम रौदळ यांनी आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी डॉ.रौदळ यांनी म्हटले की, '९ऑगस्ट' अर्थात क्रांतीदिन हा दिवस भारत देशाच्या इतिहासात अत्यंत महत्वपूर्ण असा आहे. १९४२ मध्ये 'चले जाव' आंदोलन ब्रिटिशांच्या विरोधात करण्यात आले. त्याची सुरूवात ९ऑगस्ट १९४२ रोजी करण्यात आली स्वातंत्र्य लढयाची मशाल पेटवून ब्रिटिश राजवटीला देशाबाहेर हाकलवून देण्याची हाक देणा—या क्रांतीविरांना अभिवादन करण्याचा हा दिवस महत्वपूर्ण आहे. ब्रिटिशांनी भारतातील महत्वाचे पुढारी तुरूगात टाकले असताना जनतेला मार्गदर्शन कोणी करावे अशी स्थिती असताना जनतेने ही चळवळ हाती घेतली होती.

मुंबईत भरलेल्या कॉग्रेस अधिवेशनात महात्मा गांधींनी केलेली 'चलेजाव' ची घोषणा आणि दिलेला 'करेंगे या मरेंगे' हा मंत्र ९ ऑगस्टच्या दिवशी संपूर्ण देशात पसरला होता. त्यामुळे यादिवशी क्रांतीची ज्योत पेटली. यामुळे सर्व भारतभर 'चलेजाव' चळवळ वाढत गेली प्रत्येकजण जे योग्य वाटेल ते तो करत होता चलेजाव चळवळीला कसे रोखायचे असा प्रश्न ब्रिटिशांना पडला होता. सरकारने आंदोलन कर्त्यांना तुरूगांत टाकले तरीही जनता स्वयंस्फुर्तीने चळवळ करीत होती. यादिवशीच्या रात्री महात्मा गांधींना ब्रिटिशांनी पहाटे पाच वाजताच बिर्ला हाऊस मधून ताब्यात घेतले असतांना गांधीजींनी जनतेला संदेश दिला, ''आता प्रत्येकजण पुढारी होईल'' या चळवळीत सर्वच घटकांनी सहभाग नोंदविला. महात्मा गांधींना पुण्यातील आगाखान पॅलेसमध्ये तर पंडीत नेहरू, सरदार वल्लभभाई पटेल, मौलाना आझाद इत्यादींना अहमदनगरच्या भुईकोट किल्यात ठेवण्यात आले.

चलेजाव चळवळीत नेत्यांची धरपकड झाल्याने आंदोलन जनतेच्या ताब्यात गेले देशभरात हरताळ, मिरवणुका, मोर्च यांना उत आला ब्रिटिश सरकारने लोकांना एकत्र येण्यास बंदी घातली परंतु जनता सरकारचे आदेश मानायला तयार नव्हती. पोलिसांच्या लाठीहल्याला, गोळीबाराला जुमानित नव्हते. जाळपोळ, पोलिसांची खूण, सरकारी कार्यालयांची नासधुस, रेल्वेचे रूळ उखडणे, टेलिफोनच्या तारा कापणे इत्यादी प्रकार सुरू झाले. सरकार दडपशाही करून वाटेल त्याला विनाचौकशी अटक करीत होते. संपुर्ण देश गोंधळलेल्या व अस्थीर परिस्थितीत सापडला होता.

सरकारने यासर्व प्रकाराला महात्मा गांधींना जबाबदार ठरविले तत्कालीन दुस—या जागतिक महायुध्दाचे पारडे दोस्त राष्ट्रांच्या बाजूने झुकल्याने क्रांतीची तीव्रता कमी झाली. यासर्व प्रकारामुळे ब्रिटिश सरकार हादरले. या चळवळीने जगाला वेगळी ओळख दिली. विशेष म्हणजे कोणतेच नेतृत्व नसताना स्वातंत्र्याचे युध्द जनतेने हातात घेतले होते यामुळे भारतीय स्वातंत्र्य जवळ आले आणि पुढे त्याची परिणती १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत स्वतंत्र झाला असे प्रतिपादन डॉ.सिताराम रौंदळ यांनी केले.

सदरील कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.शंकर लावरे होते त्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधतांना '९ऑगस्ट क्रांती दिन' याविषयी विचार व्यक्त केले. विद्यार्थ्यांनी चलेजाव चळवळीत हुतात्मा झालेल्या व्यक्तींचा आदर्श व कार्याचा परिचय माहीती करून घ्यावा. त्यांच्या कार्याचे स्मरण करावे. महात्मा गांधींना सत्याग्रह व अहिसेंच्या मार्गाने देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी आपले योगदान दिले. महात्मा गांधीजींच्या कार्याचा

अभ्यास, वाचन करावे. आजही जगातील विविध समस्या सोडविण्यासाठी महात्मा गांधीजीचे विचार उपयोगी ठरतील. यावेळी विदयार्थी वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता. प्रा.तुकाराम जाधव यांनी कार्यक्रमाचे आभार मानले.

**हेतु** :— ९ ऑगस्ट क्रांती दिनाचे महत्व विद्यार्थ्यांना कळावे, आपला देश पारतंत्र्यातून मुक्त करण्यासाठी हुतात्मा व्यक्तींच्या कार्याचे स्मरण व्हावे, देशाविषयी अभिमान व स्वाभिमान जागृत राहून राष्ट्रीय एकात्मता,राष्ट्रीय अखंडत्व साधण्यासाठी विद्यार्थ्यांमध्ये जागृती निर्माण करणे याशिवाय विद्यार्थ्यांमध्ये व्यक्तीमत्व विकास घडवून आणणे. राष्ट्रपुरूषांच्या कार्याची माहिती विद्यार्थ्यांना व्हावी.

**इतर माहिती** :

| दिनांक | वेळ | उपक्रमाचे नाव | समन्वयकाचे नाव | मार्गदर्शकाचे नाव | | | | एकुण सहभागी | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | नाव | पद | संपर्क | पत्ता | शिक्षक | | विदयार्थी | |
| | | | | | | | | स्त्री | पुरूष | स्त्री | पुरूष |
| ०९/०८/२०१९ | ११:३० | ९ ऑगस्ट क्रांती दिन | डॉ.संभाजी दराडे | डॉ.शंकर लावरे<br>डॉ.सिताराम रौंदळ | प्राचार्य<br>सहयोगी प्राध्यापक | ९८२२४३९२६७ | सोनई ता. नेवासा | — | ०४ | २० | ४० |

## कार्यक्रम फोटो





